पोलीस स्टेशन, धानोरा जि. गडचिरोली

**N.C.R.B** (एन.सी.आर.बी)

**I.I.F.-I** (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): गडचिरोली **P.S.**(ठाणे): धानोरा **Year** (वर्ष): 2022

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0008 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 01/02/2022 17:04 बजे

2.

| **S.No.** (अ.क्र.) | **Acts** (अधिनियम) | **Sections** (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): दरमियानी दिन

**Time Period** (कालावधी):

**Date From** (दिनांक पासून): 31/01/2022
**Date To** ( दिनांक पर्यंत): 01/02/2022
**Time From** (वेळेपासून): 13:29 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 13:00 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 01/02/2022 **Time** (वेळ): 17:04 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद क्र.): 021 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 01/02/2022 17:04 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पश्चिम, 18 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): मौजा रांगी ते जांभळी रोड,धानोरा, 442606

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): वैभव दादाजी काळबांधे

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : दादाजी काळबांधे

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 2000 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.**(अ. | **Id Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **Id Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ. क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रांगी,धानोरा,धानोरा ,गडचिरोली,महाराष्ट्र,442606,भारत |
| 2 | स्थायी पता | रांगी,धानोरा,धानोरा ,गडचिरोली,महाराष्ट्र,442606,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रणजीत प्रभुलाल कुडावले | | वडील का नाम : प्रभुलाल कुडावले | 1. उत्तर रांगी,किसाननगर वार्ड क्र 1 व्याहाड ,सावली,सावली तहसील, चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | देवराव रामचंद्र भोयर | | वडील का नाम : रामचंद्र भोयर | 1. मुरमाडी,गडचिरोली,गडचिरोली, गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

लागलीच

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु. चे 44 नोटा | 22,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 22,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ. क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद

दिनांक 01/02/2022नांव:- श्री वैभव दादाजी काळबांधे, वय 22 वर्षे, जात- सोनार, धंदा- शेती व शिक्षण, मु.पो. रांगी ता. धानोरा जि. गडचिरोली मो.नं. 9309141885 मी दिनांक 31/01/2022 रोजी श्री यशवंत राऊत, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय गडचिरोली यांचे समक्ष लोकसेवकांविरूद्ध लाच मागणी संबंधाने तक्रार नोंदविली. श्री यशवंत राऊत, पोलीस निरीक्षक यांनी माझे सांगण्याप्रमाणे माझी लेखी तक्रार नोंदवून त्यावर माझी सही घेतली. मी नोंदवलेली तक्रार खालीलप्रमाणे आहे.मी बिए प्रथम वर्षाला शिक्षण घेत असुन सोबतच शेतमजुरीचे काम करीत आहे. माझी 22 वर्षापुर्वी पासुन आजोबा व वडील यांनी तयार केलेली जबरान जमीनीवर लहान लहान पारे टाकुन दरवर्षी धानाचे उत्पन्न घेत आहोत. ती जमीन दोन ऐकर आहे. सदर जमीनीवर ट्रक्टर लावुन मोठे पारे टाकण्यासाठी मी जेव्हा जेव्हा शेतावर जातो. तेव्हा तेव्हा गैरअर्जदार श्री. कुडावले फरेस्ट गार्ड हे येतात व मला अटकाव करतात व म्हणतात की, तु या जमीनीवर वाहटी करू नको, तेव्हा मी त्यांचेशी यापुर्वी बोलणी केली. यापुर्वी सुध्दा मला अटकाव करीत आले आहे. आता तु तिस हजार रूपये दे व जमीनीवर पारे टाकण्याचे काम कर नाहीतर तु पैसे दिला नाही तर काम करू नको, माझ्याकडे पैसे नसल्याने विनवणी केली, परंतु ते मानण्यास तयार नव्हते. आज रोजी मला बोलावुन 30,000/- रूपये दे, नाहीतर ट्रक्टरने पारे टाकु नको, असे म्हणले, त्यावर मी घाबरून पारे टाकले नाही तर शेतात नुकसान होईल म्हणुन मी त्यांना माझेकडे सध्या ऐवढे पैसे नाहीत काही कमी करा, असे म्हणालो, त्यावर त्यांनी नाही, तुला 30, 000/- रू. दयावेच लागेल, नाहीतर मी तुला पारे टाकु देणार नाही. असे म्हणाले. त्यावर मी घाबरून ठिक आहे साहेब पैसे जमल्यानंतर येवुन भेटतो, असे म्हणालो असता, त्यांनी ठिक आहे तु नंतर येवुन भेट असे म्हणुन मला पैषाची मागणी केली व निघुन गेले.श्री कुडावले, फॉरेस्ट गार्ड, रांगी यांनी मला जबरान जमीनीवर पारे टाकुन शेतजमीन करण्याचे कामासाठी रु. 30,000/- लाच रक्कमेची मागणी केलेली असून त्यांना रू. 30,000/- लाच देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने मी रू. 30,000/- घेऊन आपले कार्यालयामार्फत कार्यवाही होणेकरीता स्वेच्छेने लाच लुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली येथे तक्रार देण्यास आलो. श्री कुडावले, फॉरेस्ट गार्ड, रांगी यांचेशी माझा कोणताही वैयक्तीक वैर नसुन आर्थिक

देवाण-घेवाण/उसणवारी अथवा भांडण नाही. म्हणुन मी त्यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे. मी सोबत आणलेले रू.30,000/- हे माझे वैयक्तिक बचतीतील आहे. श्री यशवंत राऊत, पोलीस निरीक्षक यांनी 2 शासकिय पंचांना पाचारण करून त्यांची व माझी एकमेकांना ओळख करून दिली. श्री राऊत साहेब यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझी लेखी तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिले. सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. पोलीस निरीक्षक श्री राऊत यांनी सुद्धा स्वाक्षरी केली.श्री यशवंत राऊत, पोलीस निरीक्षक यांनी व्हॉईस रेकार्डर कशाप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती देवुन लाच मागणीची पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हईस रेकर्डरद्वारे रेकर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. श्री यशवंत राऊत, पोलीस निरीक्षक यांनी माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू. 30,000/- (रू. 500/- दराच्या 60 चलनी नोटा) घेतले. त्यावेळी सदरच्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. सदरच्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षीक करून दाखवुन लाचेच्या रक्कमेस अँथ्रासिन पावडर लावली. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी श्री राऊत यांनी पंचनामा क्रं. 1 मध्ये घेतल्या आहेत.दिनांक 31/01/2022 रोजी पोलीस निरीक्षक राऊत, मी, शासकीय पंच व स्टफ सह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय गडचिरोली येथुन मोटार सायकल वाहनाने रवाना होवुन मौजा रांगी गावाचे अलीकडे पोहचुन रस्त्याचे कडेला आडोसा घेवून थांबून होतो. श्री राऊत, पोलीस निरीक्षक यांनी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याप्रमाणे व्हईस रेकर्डर सुरू करून व्हईस रेकर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हईस रेकर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचेसह श्री कुडावले, फरेस्ट गार्ड यांचेकडे वनविभाग कार्यालय रांगी येथे जाण्यास रवाना केले.. श्री कुडावले, फरेस्ट गार्ड यांनी पंच क्रं. 1 यांचे समक्ष माझे वडलोपार्जीत जबरान जमीनीवर पारे टाकुन शेतजमीन करण्याचे कामासाठी रू. 30,000/- लाच रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती रु. 22,000/- लाच रक्कम गै.अ. श्री भोयर वनमजुर यांचे मार्फतीने स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची खात्री केली. त्यावरून लोकसेवक श्री कुडावले, फरेस्ट गार्ड यांचेविरूद्ध आज दिनांक 1/02/2022 रोजी पुढील सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी श्री राऊत यांनी पंचनामा क्रं. 2 मध्ये घेतल्या आहेत.आज दि. 01/02/2022 रोजी लाचलचुपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथील तपासी अधिकारी श्री यशवंत राऊत, शासकिय पंच व स्टाफसह शासकिय वाहनाने मौजा रांगी गावाचे अलीकडे पोहचुन माझे मोबाईल फोनवर संपर्क करुन मला तिथे बोलावून घेतले. मी त्यांचे समक्ष पोहचलो. पंचासमक्ष अँथ्रसिन पावडर लावलेल्या नोटांचा सिलबंद लिफापा फोडुन त्यातील 8,000/- रु. मला वेळीच परत केले व रु. 22,000/- (500/रु. दराच्या 44 नोटा) लाचेची रक्कम माझे पन्टचे मागील डावे बाजुचे खिश्यात ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन लोकसेवक यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर आपल्याजवळील पांढरा दुपट्टा डोक्याला बांधावे असा इशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले. पोलीस निरीक्षक श्री यशवंत राऊत यांनी व्हईस रेकर्डर सुरु करून व्हईस रेकर्डर वर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हईस रेकर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचेसह फरेस्ट ऑफीस रांगी व येथे श्री भोयर, वनमजुर यांचेकडे जाण्यास रवाना केले. त्याचवेळी सापळा पथकातील काही सदस्य गटा-गटाने माझे मागोमाग आले. मी व पंच क्रं. 1 याचेसह फरेस्ट आफीस समोर गेलो असता, श्री भोयर, वनमजुर हे कार्यालयाचे बाहेर आले व माझे मोटार सायकलने जांभळी गावचे रोडकडे चलण्यास सांगीतले. त्यानंतर काही अंतरावर गेल्यावर मोटार सायकल थांबवुन लाच रक्कमेची मागणी केली.. त्यावेळी मी अँथ्रसिन पावडर लावलेल्या रू. 22,000/- लाचेची रक्कम माझे फुलपंटच्या मागील डावे बाजुचे खिश्यातुन काढुन श्री भोयर, वनमजुर यांना दिल्या असता, त्यांनी लाच रक्कम रू. 22,000/- आपल्या उजव्या हाताने घेवुन त्यांचे अंगातील लोअर पन्टचे डावे बाजुचे खिष्यात डावे हाताने ठेवले. त्याच वेळी मी सापळा पथकास माझे जवळील डोक्याला बांधून असलेला दुप्पटा सोडुन लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने श्री भोयर, वनमजुर यांना रंगेहात पकडले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री यशवंत राऊत यांनी श्री भोयर, वनमजुर यांना पैसे कोणी घेण्यास सांगीतले व ते कुठे आहेत अशी विचारणा केली असता त्यांनी सांगीतले की, श्री कुडावले, फॉरेस्ट गार्ड, फरेस्ट कार्यालय रांगी यांनी मला पैसे घेण्यास सांगीतले व ते कार्यालयात आहेत. असे सांगीतले. त्यावरुन गैरअर्जदार श्री कुडावले, फरेस्ट गार्ड यांना दोन्ही पंचासमक्ष मोबाईल फोनवरुन संपर्क केला असता, श्री कुडावले, फरेस्ट गार्ड हे कार्यालयात हजर असल्याचे समजले. त्यामुळे तात्काळ श्री कुडावले, फरेस्ट गार्ड याचे कार्यालयात जावुन त्यांना सुध्दा पकडुन पुढील कारवाई केली. सापळा कार्यवाहीबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक राऊत यांनी पंचनामा क्रं. 3 मध्ये घेतल्या आहेत..तरी लोकसेवक श्री. रणजीत प्रभुलाल कुडावले, वय 50 वर्षे, धंदा-नौकरी, वनरक्षक, उत्तर रांगी बिट, क्षेत्रसहाय्यक कार्यालय रांगी ता. धानोरा, जि. गडचिरोली यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून मला वडलोपार्जीत जबरान जमीनीवर पारे टाकुन शेतजमीन करण्याचे कामासाठी 30,000/- रु. लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु. 22,000/- लाच रक्कम गै.अ. श्री देवराव रामचंद्र भोयर, वय 52 वर्ष, वनमजुर रा. मुरमाडी ता. जि. गडचिरोली यांच्या हस्ते माझेकडुन पंचासमक्ष स्विकारली. म्हणुन माझी त्यांच्याविरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यानुसार कायदेशीर फिर्याद आहे. माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): YASHWANT KISAN RAUT
**Rank** (पद): I (Inspector)
**No.**(क्र.): DGPYKRM6401 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस स्टेशन, धानोरा
सत्यमेव जयते
जि. गडचिरोली

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

प्रभारी अधिकारी
पोलीस स्टेशन, धानोरा

**Name** (नाव): MADHURI SHANKARRAO

**Rank**(पद): SI (Sub-Inspector)

**No.**(सं.): 1480100362MSGF8701J

पोलीस स्टेशन, धानोरा
सत्यमेव जयते
जि. गडचिरोली

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**